Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.3 ISSN No. 2456-1665

# दुष्काळसदृश्य परिस्थितीबाबत छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार

**डॉ. निहाळ रामदास बाबाजी**
राज्यशास्त्र विभाग,
NKSPT कला, वाणिज्य् आणि विज्ञान महाविद्यालय,
बदनापूर, जि. जालना

भारताला अथवा महाराष्ट्राला दुष्काळ सदृश्य परिस्थिती ही नवीन नाही. दुष्काळाचे ऐतिहासिक परिशिलन केल्यास प्राचीन आणि मध्ययुगीन काळात अनेक दुष्काळ झाल्याचे आपणास दिसून येतात. प्राचीन काळात दुष्काळ ही एक नैसर्गिक आपत्ती अथवा दैवी प्रकोप असे मानण्यात येई.[1] यावरून असे लक्षात येते की, अज्ञानी लोक त्याला दैवी प्रकोप मानत, तर विवेकी आणि सुज्ञलोक त्याला नैसर्गिक आपत्ती मानत असत. ही नैसर्गिक आपत्ती मध्ययुगीन भारतात अनेक वेळा आल्याची आपणास दिसून येते. ती म्हणजे मुहम्मद तुघलकाच्या काळात (१३२५-१३५१) ला, १५४० केरळ प्रांतातील दुष्काळ, १५५५, उत्तरे कडील दुष्काळ १६३० चा "थोरला दुष्काळ"[2] इत्यादी दुष्काळाची मध्युगीन भारताच्या इतिहासात नोंद आहे.

यापैकी १६३० चा जो दुष्काळ झाला होता. त्याला "थोरला दुष्काळ" म्हणून नामाभिधान करण्यात आले होते. कारण हा दुष्काळ अतिशय भयानक होता. त्या दुष्काळाचे वर्णन महम्मद अमीन काझवी यांच्या १६३० च्या "पादशहानामा" या ग्रंथात आपणाला पाहायला मिळते.[3] ते असे की,

"भाकरीच्या तुकड्यासाठी लोक स्वतःला विकून घ्यावयास तयार होते, पण विकत घेणारच कोणी नव्हता; एका भाकरीसाठी आपले लोक आपल्या पदाचा त्याग करावयास तयार होते. पण त्याची कोणाला पर्वा नव्हती; ज्या हातांनी इतरांना उदंड दान केले, तेच हात आता भिक्षेसाठी पुढे पसरले होते; ज्या पावलांनी सदा सुखाचाच मार्ग क्रमिला होता; तीच पावले आता अन्नाच्या शोधासाठी पडत होती. कित्येक दिवस कुत्र्याचे मांस बकरीच्या मांसाच्या दराने विकले जात होते. आणि मृतांच्या हाडांची भुकटी पिठात मिसळून ते विकले जात असे. शेवटी दारिद्र्य इतके शिगेला पोहोचले की, माणसे माणसांना खाऊ लागली आणि पुत्र प्रेमापेक्षा त्याचे मांस पित्याला प्रिय वाटू लागले. मृतदेहांनी गावाच्या रस्त्यात अडथळे निर्माण केले आणि ज्यांना या यातनांनी मरण येत नव्हते आणि हालचाल करण्याचे त्राण अद्याप ज्यांच्यात होते, ते परप्रांतात भटकेगिरी करण्यास निघून गेले."[4]

अशा प्रकारचे भयानक चित्रण (वर्णन) थोरल्या दुष्काळाचे आपणास दिसून येते. या दुष्काळामुळे संबंध भारतात वाईट परिस्थिती निर्माण झाली होती. त्यातल्या त्यात महाराष्ट्र आणि गुजरात या दोन भागांवर खूप वाईट परिणाम झाला होता. याच पार्श्वभूमीवर १९ फेब्रुवारी, १६३० रोजी शिवरायांचा जन्म झाला.[5] शिवरायांचे वडील शहाजीराजे हे तत्कालीन काळात कधी निजामशाहीत, कधी मोगलांकडे, तर कधी अदिलशाहाकडे चाकरी करीत होते.[6] या सर्व यवनी (परकीय) राजवटी अन्यायी-अत्याचारी होत्या, असे जिजामातेने बालशिवरायाच्या मनावर बिंबवले. यवनी सत्तेविषयी तिरस्कार आणि अमानूष अत्याचारांचा प्रतिकार करण्याची भावना जिजामातेने शिवरायांच्या मनात रूजविली. अशा संस्कारमय वातावरणात शिवरायांचे बालपण गेले व त्यांच्या मनात लहानपणापासूनच अन्याय-अत्याचार करणाऱ्यांविरुध्द तिरस्कार निर्माण झाल्यामुळे त्यांनी स्वराज्य (न्यायाचे राज्य) स्थापनेची शपथ घेतली. "बोले तैसा चाले, त्याची वंदावी पावले" या उक्तीप्रमाणे अगदी बोटावर मोजण्याएवढे शूरवीर मावळे सोबत घेऊन शिवरायांनी तोरणा किल्ला जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले,[7] असा उल्लेख आपणास इतिहासात पहायला मिळतो.

हिंदवी स्वराज्य म्हणजे भारतीयांचे अथवा स्वकियाचे राज्य होय. ते राज्य रयतेच्या कल्याणाचे आणि सामाजिक न्यायाचे होते. कारण पूर्वीच्या राजवटीत अन्याय-अत्याचाराने पिचलेल्या लोकांना त्या जोखडातून मुक्त करून सर्व समाज घटकाचा विकास होईल, अशा राज्याची शिवरायांनी स्थापना केली होती. त्यांना कल्याणकारी, शोषणरहीत, धर्मनिरपेक्ष स्वरूपाचे राज्य चालवायचे होते. म्हणून त्यांनी इतिहासातील अनेक वाईट घटनांचे सिंहावलोकन करुन राज्यकारभाराचे नियोजन केले होते. "जो इतिहास विसरतो तो इतिहास घडवू शकत नाही"[8] या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराप्रमाणे शिवरायांनी इतिहासातील दुष्काळजन्य (सदृश्य) परिस्थिती व अन्याय-अत्याचाराच्या घटना विसरले नाहीत. त्यांनी दुष्काळावर मात करण्यासाठी पाटस्थळे (पाटबंधारे), मोटस्थळे (विहिरी),[9] उभारल्याची इतिहासात नोंद आहे. जसे शिवापूरचा कालवा हा शिवकालीन आहे. त्याची माहिती १७८९ सालच्या देशपांड्यांच्या कागदपत्राव्दारे आपणास मिळते.[10] तसेच १६७४ सालच्या एका महजरावरून पाटबंधाऱ्याच्या कामाची कल्पना येते.[11]

यावरुन आपणास असे लक्षात येते की, शिवरायांनी "थोरल्या दुष्काळाची पुनरावृत्ती होऊ नये याची काळजी घेतली व हाती घेतलेले काम (कालवे, बंधारे, विहिरी) पुर्णत्वास नेण्यासाठी जातीने दखल घेतल्याचे दिसून येते. एवढेच नव्हे तर ते स्वत: शिवापूरच्या कालव्याची आणि बाणगंगा नदीवरील बंधाऱ्याची पाहणी करण्याचा उल्लेख इतिहासात मिळतो. हा शिवरायांचा

आदर्श आजच्या शासनकर्त्यांनी या दुष्काळ सदृश्य परिस्थितीत घेतला पाहिजे. जेणेकरून दुष्काळ परिस्थितीमध्ये सर्व सामान्यापर्यंत शासनची मदत जाईल व ती त्यासाठी सहाय्यभूत ठरेल. तसेच भविष्यात आजच्या सारख्या पाण्याचा प्रश्नं निर्माण होणार नाही.त्यासाठी शिवरायांच्या कार्यांचा आढावा (अवलोकन) आजच्या शासनकर्त्यांसाठी उपयुक्त ठरतो. त्याचप्रमाणे तत्कालीन परिस्थितीत बेरोजगारीचा प्रश्नं उद्‌भवत असे. कारण तत्कालीन शेती बहुतांशी कोरडवाहू (जिरायती) असल्यामुळे शेतकरी चार-सहा महिने शेती केल्यानंतर वर्षातील बाकी राहिलेले महिने ते बेकार राहत.[12] त्यावेळी बेकारीचा प्रश्नं उद्‌भवत होता. तो प्रश्नं सोडविण्यासाठी शिवरायांनी तत्कालीन परिस्थितीत "लष्करी पेशा" हा पर्याय बेकारांसमारे ठेवून त्यांना लष्करी सेवेत सामावून घेतले म्हणजे शेतीबरोबर सैन्यातील नोकरी हा जोड-व्यवसाय शेतकऱ्यांना मिळाला.[13]

यावरुन असे दिसून येते की तत्कालीन परिस्थितीला अनुसरून शिवरायांनी बेकारीचा (बेरोजगारीचा) प्रश्नं निकालात काढला अथवा संपुष्टत आणला. तशाच प्रकारे आजही दुष्काळ सदृश्य परिस्थितीत बेरोजगाराची समस्या (प्रश्न) भथानक आहे. ती आजच्या परिस्थितीला अनुसरून शासनकर्त्यांनी शिवरायांचा आदर्श घेवून सोडविली पाहिजे.

शिवरायांचे शेतीविषयक धोरण अतिशय महत्वपूर्ण होते. कारण प्राचीन काळापासून भारत हा कृषिप्रधान देश असल्याने शेतीवरच देशाची अर्थव्यवस्था प्रामुख्याने अवलंबून आहे. तत्कालीन परिस्थितीत सुध्दा राज्याचा प्रमुख महसूल हा जमीन महसूल (शेतसारा) होता. तो शेतसारा वसूल करण्यासाठी गावपातळीवर पाटील-कुलकर्णी व परगण्याचा वसूल देशमुख-देशपांडे करत असत. हे काम त्यांच्याकडे वंश परंपरेने चालत आलेले होते.[14] ही मंडळी रयतेवर अन्याय-अत्याचार, जुलूम-जबरदस्ती करत असत. दुष्काळ, महापूर अशा प्रसंगी सुध्दा रयतेला महसुलात सूट दिली जात नसे; गोळा झालेला महसूल थोडाच सरकारी तिजोरीत जात असे आणि त्याचा जास्तीत-जास्त हिस्सा पाटील-कुलकर्णी, देशमुख-देशपांडे या दलालाच्या खिशात जात असे अथवा त्यावर ते डल्ला मारीत असत. या सर्व परिस्थितीचा बारकाईने (सूक्ष्मपणे) शिवरायांनी विचार करून त्यांनी' "जमीनदारी पध्दत रद्द करून रयतवारी पध्दत" सुरू केली आणि महसूल गोळा करण्यासाठी स्वतःचे (सरकारी) अधिकारी नियुक्त केले.[15] त्या अधिकाऱ्यावर शिवराय स्वत: नियंत्रण ठेवीत असत. अर्थात रयतेविषयी अथवा शेतकऱ्याविषयी त्यांच्या मनात प्रचंड आस्था होती. म्हणून तर त्यांनी वसुली अधिकाऱ्यांना सक्त ताकीद दिली होती की, "शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात लागता कामा नये."[16] अशी ताकीद देणारा भारतीय

इतिहासातील पहिला राजा आपणास पहावयास मिळतो. त्याचा विचार लोकहिताचा आहे. त्यांना आपण लोकशाहीवादी संबोधने संयुक्तिक ठरते.

एवढेच नव्हे तर दुष्काळात अथवा नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्याला मागील कर्ज माफ केले जात असे.[17] तसेच दुष्काळ सदृश्य परिस्थितीत परागंदा (विस्थापित, स्थलांतरित) झालेल्या लोकांना परत गावामध्ये आणून सरकारकडून अनेक सवलती देत असत. ते म्हणजे पहिल्या वर्षी महसूल माफ असे, नंतर हळूहळू तो वाढविला जात होता. तसेच ज्यांना बैल, नांगर इत्यादी साधने घेण्याची ऐपत नसेल, तर अशा रयतांना (शेतकऱ्यांना) सरकारकडून कर्ज मिळण्याची व्यवस्था करण्यात येत असे. हे कर्ज रयताची ताकद पाहूनच त्याच्याकडून वसूल करावे आणि एखाद्या रयतेस कर्ज फेड करणे शक्ती बाहेर असेल तर रिपोर्ट राजांना अधिकाऱ्यांनी करावा. शिवराय त्यास कर्जमाफी देतील असे त्यांनी आज्ञापत्र काढले.[18]

या आज्ञापत्रावरून शिवरायांतील असलेली मानवतावादी दृष्टी आपणास दिसून येते. अर्थातच पूर्वीच्या अन्याय-अत्याचारी राजवटीला पूर्णपणे नाकारून एक सामाजिक न्यायाची भूमिका त्यांनी स्वीकारल्याचे आज्ञापत्रात प्रतिबिंबित होते. तसेच दुष्काळ सदृश्य परिस्थितीला सावरून दुष्काळग्रस्ताचे नव्याने पुनर्वसन केल्याचे आपणास दिसून येते. या आज्ञापत्राची दखल आजच्या शासनकर्त्यांनी घ्यावी. कारण दुष्काळ सदृश्य परिस्थितीला कसे सावरावे याचा, बोध त्यातून होतो.

शिवकालामध्ये पडिक जमीन खूप होती. तुलनात्मकदृष्ट्या मनुष्यबळ कमी होते. अशा परिस्थितीत शिवरायांचे सरकार पडिक जमीन अधिकाधिक लागवडीखाली आणण्याचे प्रयत्नं करीत असे. त्यानुसार ते रयतेला प्रोत्साहन व सवलती देत असत.[19] यामुळे जमीन अधिक लागवडी खाली आली असता, रयतेचेही कल्याण होत होते आणि सरकारचाही महसूल वाढत असे. म्हणजे “प्रजा सुखी तर राजा सुखी” अशा दूर दृष्टिकोनातून शिवरायांनी आपले कल्याणकारी राज्य चालवल्याचे आपणास दिसून येते. आजही शिवरायांच्या त्या दृष्टिकोनाची गरज आहे. कारण SEZ आणि Molle च्या युगात आजचे शासनकर्ते शेतकऱ्याला पडिक शेती न देता उद्योग पत्याला अथवा भांडवलदाराला अगदी माफक दरात देत आहे. त्या जमिनीचा उपयोग ते आपल्या स्वत:च्या विकासासाठी करीत आहेत. हे शिवरायांच्या विचाराशी सुसंगत नाही. म्हणून शेवटी असे म्हणावे लागते, आधुनिक काळात SEZ आणि Molle व्दारे मुगलशाही, अदिलशाही आणि निजामशाही प्रस्थापित करण्यापेक्षा जनकल्याणाची शिवशाही प्रस्थापित करावी. त्यांच्या विचारानेच आज लोकशाहीला संवर्धित करता येईल, यात तीळमात्रं शंका नाही.

**संदर्भ ग्रंथ**

१) डॉ. कुलकर्णी, अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र, पृ. ६४, राजहंस प्रकाशन, पुणे, १९९३.

२) कित्ता

३) कित्ता, पृ.६६

४) कित्ता.

५) प्रा. मार्डीकर मदन, मराठ्यांचा इतिहास (इ.स.१६३० ते १८१८), पृ. ३७, विद्या बुक्स, पब्लिशर्स, औरंगाबाद, २००८.

६) कित्ता, पृ. ३९.

७) कित्ता, पृ. ४०.

८) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषणे, खंड-१८

९) डॉ. कुलकर्णी अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र, पृ.५९, ६०, राजहंस प्रकाशन, पुणे, १९९३.

१०) कित्ता

११) कित्ता

१२) प्रा.जयसिंगराव भाऊसाहेब पवार, मराठी सत्तेचा उदय, पृ. ३०२, सी. जमनादास आणि कंपनी, मुंबई, १९७८-७९.

१३) डॉ. कुलकर्णी, अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र, पृ. ५२, राजहंस प्रकाशन, पुणे-१९९३.

१४) प्रा. जयसिंगराव भाऊसाहेब पवार, मराठी सत्तेचा उदय, पृ.३०२, सी. जमनादास आणि कंपनी मुंबई, १९७८-७९.

१५) कित्ता, पृ.३००.

१६) प्रा. मार्डीकर मदन, मराठ्यांचा इतिहास (इ.स.१६३० ते १८१८), पृ.२१७, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद - २००८.

१७) कित्ता, पृ. २१८.

१८) कित्ता

१९) प्रा. जयसिंगराव भाऊसाहेब पवार, मराठी सत्तेचा उदय, पृ. ३०२, सी. जमनादास आणि कंपनी मुंबई, १९७८-७९.